| MHKO100006722018 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :– | २६/०९/२०१८ |
| | नोंदणी दिनांक | :– | २६/०९/२०१८ |
| | निकाल दिनांक | :– | १६/०३/२०२६ |
| | कालावधी | :– | वर्ष महिने दिवस |
| | | | ७ ५ १८ |

**नियमित फौजदारी खटला क्र.८६/२०१८ निशाणी क्र. १८/ब**

**फॉर्म क्र.३२**
**भाग 'अ'**
**(निकालाचे शिर्षक पृष्ठ )**
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (i) अन्वये)

| **गडहिंग्लज येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात<br>पिठासीन अधिकारी : डी.एम.पवार** | | |
|---|---|---|
| गुन्हा नोंद क्र.८६/२०१८, गडहिंग्लज पोलीस ठाणे, गडहिंग्लज. | | |
| **फिर्यादी / तक्रारदार** | :– | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>गडहिंग्लज पोलीस ठाणे, गडहिंग्लज. |
| **अभियोग पक्षातर्फे** | :– | सहाय्यक सरकारी अभियोक्ता डी.ए.पांचाळ |
| **आरोपी** | १ | युवराज चाळु सावंत<br>वय–३० वर्षे, धंदा – हमाली<br>रा. महागाव, ता. गडहिंग्लज<br>ह.रा. खादोली सडयावर कोंऊरा, वेंगुर्ला, |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | | व्ही.आर.नाईक |

**भाग–ब**
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २५/०७/२०१८ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | ३०/०७/२०१८ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २६/०९/२०१८ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | २८/०९/२०१८ |

| | | |
|---|---|---|
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १३/१०/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | १६/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १६/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते. |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडलेचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतीम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | युवराज चाळु सावंत | ३१.०७.२०१८ | ३१.०७.२०१८ | भा.द.वि कलम ३७९ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

**भाग–क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | किरण इराप्पा वडर | पंच साक्षीदार | १३ |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १. | दोषारोपपत्र. |
| २. | १४ | घटनास्थळ पंचनामा |

# न्या य नि र्ण य

(दिनांक १६/०३/२०२६ रोजी घोषित केला)

प्रस्तुतच्या खटल्याअंतर्गत आरोपीने भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये शिक्षेस पात्र असणा–या अपराधांकरीता संपरिक्षा दिलेली आहे.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणेः–**

२. दिनांक २५/०७/२०१८ रोजी १६.३० ते १७.०० वाजताचे दरमान्य मौजे गडहिंग्लज, ता.गडहिंग्लज, जि. कोल्हापूर येथे डॉ. पट्टणशेट्टी हॉस्पीटल समोर लावलेली हिरो फॅशन मोटारसायकल क्र.के.ए.२२ ईए–७५३५ ही स्वत:च्या फायदयाकरीता फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने चोरून नेली, म्हणून फिर्यादीने गडहिंग्लज पोलिस ठाणे येथे फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीवरुन गडहिंग्लज पोलीस स्टेशन गु.र.नं. १४५/२०१८ भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. तपासाअंती तपासी अधिकारी यांनी आरोपी यांचे विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपीविरूध्द निशाणी ०५ वर दोषारोप नोंदवला. आरोपी गैरहजर राहिल्याने त्यांचेविरूध्द अजामीनपात्र वॉरंट काढले तसेच जामीनदारांना नोटीस काढण्यात आले. त्यानंतर आरोपीविरूध्द जाहीरनामा प्रसिध्द केला. आरोपी विरुध्द जाहीरनामा प्रसिध्द करुनही तो हजर होत नसलेने फौ.प्र.सं.क.२९९ प्रमाणे त्यांच्या अनुपस्थितीत पुरावा नोंदविणेत आला. आरोपी हजर नसल्याने आरोपीचे फौ.प्र.सं.कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

५. अभिलेखावरील साक्षीपुराव्यावरुन खालील मुद्दे खटल्याच्या विचारार्थ

उपस्थित झाल्याने त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक २५/०७/२०१८ रोजी १६.३० ते १७.०० वाजताचे दरमान्य मौजे गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज येथील डॉ. पट्टणशेट्टी यांचे हॉस्पीटल समोर लावलेली फिर्यादीचे मालकीची हिरो पॅशन कंपनीची मोटारसायकल क्र.के ए २२/ई ए–७५३५ ही त्यांचे संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने चोरून नेली, हे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय? | नाही. |
| २ | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

६. आरोपीवरील दोषारोपाच्या शाबीतीसाठी अभियोग पक्षाने वर नमुद केल्याप्रमाणे साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे.

७. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील यांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणामधील दाखल संपुर्ण कागदपत्रांचे अवलोकन केले. अभियोग पक्षाने निशाणी क्र.१७ वर पुरसीस दाखल करुन सरकार पक्षाला आणखी तोंडी पुरावा करणेचा नाही असे कळविले आहे.

**मुद्दा क्रमांक १ करीता –**

८. अभियोग पक्षाने त्यांच्यातर्फे निशाणी १३ वर पंच साक्षीदार किरण इराप्पा वडर यांची साक्ष नोंदवली. सदर साक्षीदाराने त्यांच्या साक्षी पुराव्यात असे कथन केले आहे की, दिनांक ३०/०७/२०१८ रोजी पोलीसांनी पंचनामा करण्यासाठी त्यांना पट्टणशेट्टी हॉस्पीटल समोर बोलवले होते व त्यावेळी

ते, फिर्यादी, दुसरे पंच दावणे असे गेले होते . घटनास्थळ फिर्यादीने दाखविले होते व त्यांच्या समक्ष पंचनामा निशाणी १४ प्रमाणे केला होता.

९. फिर्यादीचे मोटारसायकलची चोरी झाली हे सिद्ध करण्यासाठी फिर्यादीची साक्ष या कामी नोंदवली नाही. जरी घटनास्थळ पंचनामा शाबीत झाल्याचे गृहीत धरले तरी सदर मोटारसायकलची चोरी आरोपीनेच केली हे सिद्ध होत नाही. फिर्यादी व इतर साक्षीदारांना साक्षी समन्स काढूनही ते न्यायालयात हजर राहिले नाहीत. त्यामुळे,आरोपीविरुध्द दोषारोपीत केलेला गुन्हा सिध्द करण्याकरीता पुरेसा पुरावा अभिलेखावर उपलब्ध नसल्याने आरोपी निर्दोष मुक्त करण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ बाबत -**

**१०.** प्रस्तुत प्रकरणात जप्त मुद्देमाल हिरो पॅशन प्लस मोटारसायकल क्र.के.ए.२२/ईए/७५३५ ही मुळ मालकास परत केली असून अपिल कालावधी संपलेनतर तिचा ताबा त्याच्याकडे कायम करण्यात येतो. वरील सर्व कारणांचा विचार करता मी मुद्दा क्र.२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१ आरोपीस भारतीय दंड संहितेच्या कलम ३७९ अन्वये शिक्षेस पात्र अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२ आरोपीचा जामीन कदबा व जातमुचलका रद्द करण्यात येतो.

३ जप्त मुद्देमाल हिरो पॅशन प्लस मोटारसायकल क्र.के.ए.२२/ईए/ ७५३५ चा ताबा मुळ मालकाकडे अपिल कालावधी संपलेनतर कायम करण्यात येतो.

४ मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रंजना सुर्यवंशी विरुध्द जयप्रकाश गुप्ता, क्रि.अर्ज.३८०/२०१९ मधील क्रि.अपील (एस.टी) क्र.३९०/२०१९ या न्यायनिवाडयामध्ये निर्देशित केलेप्रमाणे या न्यायनिर्णयाची प्रत मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे सत्वर पाठविण्यात यावी.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.03.17 10:58:39 +0530

दिनांकः १६/०३/२०२६.
ठिकाण – गडहिंग्लज.

डी. एम. पवार
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट क्र.२)
गडहिंग्लज.